Annexure IV(8)
(Vide Article-4.09)

गोपनीय अभिलेखाची प्रतवारी ठरविण्याबाबत ........

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक इसबी-सीएफआर-१०८५/८६८/तेरा,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ९ सप्टेंबर, १९८८.

पहा :- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीएफआर-१२७७/५६२/तेरा, दिनांक ७ जुलै, १९७७.

निर्णय :- उपरोक्त दिनांक ७ जुलै, १९७७ च्या शासन परिपत्रकानुसार गोपनीय अभिलेखाची प्रतवारी ठरविण्यासाठी पुढे नमूद केलेले सात प्रकार विहित करण्यात आलेले होते :-

| | | | |
|---|---|---|---|
| १] | अत्युत्कृष्ट | - "अ+" | (Outstanding - (A+) |
| २] | उत्कृष्ट | - "अ" | (Very good - (A) |
| ३] | जवळ जवळ उत्कृष्ट | - "अ-" | (Nearing Very good - (A-) |
| ४] | निश्चित चांगला | - "ब+" | (Positively good - (B+) |
| ५] | चांगला | - "ब" | (Good - (B) |
| ६] | साधारण | - "ब-" | (Average - (B-) |
| ७] | साधारणहून कमी | - "क" | (Below Average - (C) |

२. गोपनीय अभिलेखाची प्रतवारी ठरविण्याचे सध्याचे सात प्रकार केंद्र शासनाच्या धरतीवर कमी करण्याबाबत विचार चालू होता. शासनाने याबाबत काळजीपूर्वक विचार करून, गोपनीय अभिलेखाची प्रतवारी ठरविण्याच्या सध्याच्या सात प्रकारातील "जवळ जवळ उत्कृष्ट[अ-] [Nearing Very Good (A- ]" ही प्रतवारी वगळून गोपनीय अहवालाच्या प्रतवारीचे पुढे नमूद केलेले सहा प्रकार यापुढेही सुरु ठेवण्यात यावेत असे ठरविले.

| | | | |
|---|---|---|---|
| १] | अत्युत्कृष्ट | - "अ+" | (Outstanding - (A+) |
| २] | उत्कृष्ट | - "अ" | (Very Good - (A) |
| ३] | निश्चित चांगला | - "ब+" | (Positively Good - (B+) |
| ४] | चांगला | - "ब" | (Good - (B) |
| ५] | साधारण | - "ब-" | (Average - (B-) |
| ६] | साधारणहून कमी | - "क" | (Below Average - (C) |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मु. स. मोकाशी,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

कृ. मा. प.